**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दादासाहेब जोतीबा जाधव
मु.पो.सुरवड, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, इंदापूर सहकारी
साखर कारखाना लि.बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलिकर्ता** श्री.दादासाहेब जोतीबा जाधव
मु.पो.सुरवड, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.बी.जे.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, इंदापूर सहकारी
साखर कारखाना लि.बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.एम.नरूटे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.११.२००७ व २७.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

इंदापूर सहकारी साखर कारखाना लि., बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्याकडून पाणीपट्टीची अवाजवी वसुली केली जाते. १८८ सभासदांबाबतची माहिती मागितली असता दिली नाही. दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, इंदापूर सहकारी साखर कारखाना लि., बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दादासाहेब जोतीबा जाधव यांनी केली.

अपीलकर्त्याच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले व सर्व माहिती दिली. मुद्देनिहाय माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिले. त्यानंतरही माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, इंदापूर सहकारी साखर कारखाना लि., बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.एम.नरूटे यांनी केले. दिलेली माहिती योग्य असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.जे.देशमुख यांनी केले. मुंबई उच्च न्यायालयाने रिट क्र.८३८२/२००८ मध्ये विघ्नहर सहकारी साखर कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचा निर्णय दिला आहे. तो आपल्या कारखान्यालाही लागू असल्याचे लेखी निवेदन कारखान्याचे कार्यकारी संचालक

श्री.एन.एल.कापडनीस यांनी सादर केले. इंदापूर सहकारी साखर कारखाना लि., बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे सार्वजनिक प्राधिकरण ठरतो की नाही, याबाबतचे पुरावे उभय बाजूंनी सादर केलेले नाहीत. तसेच कारखान्यांने माहिती दिली आहे, हे लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वनाथ मारूती गोरे
मु.पो.आळंदी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वनाथ मारूती गोरे
मु.पो.आळंदी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.डी.पी.शेंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.पी.डी.भंडारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.७.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.विश्वनाथ मारूती गोरे यांनी सन २००१ मधील कारणे दाखवा नोटिशीच्या व टिपणीच्या व सन १९९२ मधील काही कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले. उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत तसे कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.पी.डी.भंडारे यांनी नमूद केले.

आपल्याला सर्व नकला मिळाल्या नाहीत व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ यांचा लेखी आदेशही मिळाला नाही, असे श्री.गोरे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

पेन्शन विक्री आदी आदेशांसह कागदपत्रांच्या ऊर्वरित नकला आठ दिवसांत अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता करण्यात आल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१

श्री.पी.डी.भंडारे व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.डी.पी.शेंडकर यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाल काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.निलेश जयंत पाठक
कोणार्क कोर्ट, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा सादल बाबाजवळ,
राठी चेंबरसमोर, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथावनसंरक्षक, वनसंरक्षक कार्य आयोजना
विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य
आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.निलेश जयंत पाठक
कोणार्क कोर्ट, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा सादल बाबाजवळ,
राठी चेंबरसमोर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथावनसंरक्षक, वनसंरक्षक कार्य आयोजना
विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य
आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.१२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

माहिती मागितल्यापासून तीस दिवसांनी शुल्क कळविले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर माहिती पाठविली. माहिती निःशुल्क मिळणे आवश्यक असताना शुल्क घेतले व चुकीची माहिती दिली. ससून हॉस्पिटलने दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रात खाडाखोड केल्याचा आरोप आपल्या वडिलांवर केला आहे. योग्य माहिती मिळावी व विनाशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड.निलंश जयंत पाठक यांनी केली.

संबंधित विषयात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.सी.एस.जॉर्ज यांनी सादर केली.

माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार तपशील व माहिती चुकीची असल्याच्या अपीलकर्त्याच्या आरोपाबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे यांनी चार दिवसांत आयोगाला सादर करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे श्री.दी.वि.अमृतकर यांनी

दि.२०.२.२०१०च्या पत्रान्वये तपशीलवार अहवाल आयोगाला सादर केला. श्री.पाठक यांचा अर्ज दि.२२.१०.२००७ रोजी प्राप्त झाला. दि.१९.११.२००७ रोजी त्यांना शुल्क कळविले. दि.१९.१२.२००७ रोजी त्यांच्याकडून शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी त्यांना माहिती देण्यात आली. मूळ अभिलेखानुसार सर्व माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी या अहवालात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास आकारलेल्या ११४ रूपये शुल्काचा त्यांना दिलेला तपशील पाहता शुल्क आकारणी योग्य नाही, हा अपीलकर्त्याचा आक्षेप रास्त असल्याचे स्पष्ट होते. माहिती तयार करण्यासाठी आस्थापना लिपिकाच्या तीन तासांच्या वेतनाचा १०० रूपये खर्च त्यांनी शुल्कात नमूद केला आहे, अशा प्रकारे शुल्क आकारणी करणे नियमबाह्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) माहितीसाठी जादा आकारलेले शुल्क रू.१००/- व्यक्तिशः जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनसंरक्षक कार्य आयोजना विभाग, पुणे स.नं.४९, फॉरेस्ट कॉलनी, वानवडी, पुणे श्री.दी.वि.अमृतकर यांनी ते अपीलकर्त्यास परत करावे व आयोगाला अनुपालन अहवाल दि.५.५.२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २०.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.अशोक सखाराम गिजरे
१७, मेघना टेरेस, मृत्युंजय सोसायटी, मयुर कॉलनी, कोथरूड, पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, शिक्षण प्रसारक मंडळी,
एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, शिक्षण प्रसारक मंडळी,
एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.जी.के.शिरूडे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.डी.एन.शेठ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत झाले नाही. पुन्हा दि.२४.२.२००९ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश केला गेला होता. परंतु अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता डॉ.अशोक सखाराम गिजरे यानी त्यांच्या रजा रोखीकरणाच्या संदर्भात माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.माधव पेंडसे यानी रजा रोखीकरणाच्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा केली व नंतर तपशिलाचे पत्र पाठविले परीक्षांचे निकाल, प्रवेश प्रक्रिया आदींमुळे लेखी तपशील कळविण्यास विलंब झाला, असे डॉ.पेंडसे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. डॉ.गिजरे यांच्या मूळ मागणीनुसार पूर्तता करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.दिलीप नारायणदास शेठ यांनी केले.

डॉ.गिजरे यांना उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रजा रोखीकरणाची रक्कम दि.१०.८.२००८ रोजी देण्यात आली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, शिक्षण प्रसारक मंडळी, एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.जी.के.शिरूडे यांनी केले.

रजा रोखीकरणाच्या संदर्भातील प्रशासकीय कार्यवाहीचा व न्यायालयात असलेल्या प्रक्रियेसंबंधातील विषय असला तरी विहित मुदतीत माहिती दिली पाहिजे, याची समज सर

परशुराम महविद्यालयाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, एस.पी.कॉलेज, टिळक रोड, पुणे डॉ.माधव पेंडसे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सतीश रजनीकांत राठोड
८/१०, कोणार्कनगर-१, विमाननगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतीश रजनीकांत राठोड
८/१०, कोणार्कनगर-१, विमाननगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे श्री.एस.एल.गणेशकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे श्री.एम.व्ही.दुसाणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.८.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.९.२००७ व ५.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

एका इमारतीमधील अधिकृत व अनधिकृत वीज जोडणीबाबत बिल्डरने सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. काही रहिवाशांना वीज मीटर दिला आहे. आपल्याला मात्र दिलेला नाही व माहितीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सतीश रजनीकांत राठोड यांनी केली.

संबंधित इमारत त्यावेळी बंडगार्डन विभागाच्या कक्षेत येत होती. माहितीबाबत त्या विभागाला कळविले. तसेच उपलब्ध कागदपत्रे विहित मुदतीत दिली. बंडगार्डन कार्यालय दोन वेळा स्थलांतरित झाल्यामुळे इतर कागदपत्रे मिळत नसल्याचे बंडगार्डन विभागाने कळविले. त्यामुळे ऊर्वरित कागदपत्रे देता आली नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे श्री.एम.व्ही.दुसाणे यांनी केले. बिल्डरने अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे साधारणतः दहा वर्षे जतन केली जातात, असे त्यांनी नमूद केले.

बिल्डरचे ना हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय वीज-मीटर देता येत नाही, हेही श्री.राठोड यांना स्पष्ट करण्यात आले आहे. बिल्डर व श्री.राठोड यांच्यात काही वाद असल्यास व त्यामुळे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्यास तो विषय वीज मंडळाच्या कक्षेतील नाही, असे प्रतिपादन

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे श्री.एस.एल.गणेशकर यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) मीटर मिळण्याबाबतची अपीलकर्त्याची मागणी महितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. तथापि वीज जोड देण्यासाठी बिल्डरने सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीचा जतनाच्या कालावधीनुसार शोध घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे यांनी आयोगास अहवाल सादर करावा. जतनाच्या कालावधीनुसार कागदपत्रे उपलब्ध नसल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा, २००५ अन्वये कारवाई करावी. अपिलीय प्राधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं., वडगावशेरी विभाग, कल्याणीनगर, पुणे-नगर रोड, पुणे यांनी दि.१५.५.२०१० पर्यंत याबाबतची कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९ .४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नथूराम विठ्ठल मुळुक
आखरवाडी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, राजगुरूनगर,
ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नथूराम विठ्ठल मुळुक
आखरवाडी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.सुभाष भागडे

**जन माहित्ती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर,
ता.खेड, जि.पुणे श्रीमती शीतल मुळे भामरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

कुळकायदा प्रकरणातील ३२-ग निर्णयानंतर प्रांत अधिकाऱ्यांकडे फेरनिकाल झाला. त्या प्रकरणातील कागदपत्रे बनावट असून अस्तित्वात नसलेल्या संचिकेचा आधार दाखविला आहे. त्याबाबतची माहिती अभिलेख कक्षात आढळत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नथुराम विठ्ठल मुळुक यांनी केली.

सन १९५० मधील प्रकरण असून प्रांत अधिकाऱ्यांनी ग्राह्य धरलेली कागदपत्रे बनावट आहेत की नाही, याबाबतचा अभिप्राय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत व विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देऊ शकणार नाहीत. तसे अपीलकर्त्यास वेळोवेळी स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे श्रीमती शीतल मुळे भामरे यांनी केले.

सन १९५० मधील संबंधित कागदपत्रे अभिलेख कक्षात शोध घेऊनही उपलब्ध होत नाहीत. तसेच त्यावेळच्या कागदपत्रांवर असलेला शिक्का मिळण्याची अपीलकर्त्याची मागणी असून आजमितीला असा शिक्का उपलब्ध नाही, असेही त्यांना लेखी व तोंडी कळविले. मूळ प्रश्नाबाबत त्यांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे उचित ठरेल, असेही त्यांना सांगण्यात आले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे

यांनी केले. संबंधित अभिलेख कायमस्वरूपी जतनाचे असून अभिलेख कक्षात शोध घेण्यात येत असून प्राप्त झाल्यास अपीलकर्त्यास त्यांच्या प्रती पुरविण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले. त्यानुसार कार्यवाही करावी व अपीलकर्त्यास आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित सर्व संचिका अवलोकनााठी उपलब्ध करून देऊन मागणीनुसार प्रती नि:शुल्क द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे यांना दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल मधुकर जगताप
२११, मुंढवा, पुणे-४११०३६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६६ + २०२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

४ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुनिल मधुकर जगताप
२११, मुंढवा, पुणे-४११०३६

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ. दीपा बापूसाहेब भोसले

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १६६६/ पुणे | ६.११.२००६ | ११.१२.२००६ | ६.१.२००७ | ३०.५.२००७ |
| २०२२/ पुणे | २१.२.२००८ | -- | ३.४.२००८ | -- |
| ८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | | | | |

## विवेचन

वरसगाव धरणासाठी संपादन व पुनर्वसन केलेल्या गावांचे स.नं. / गट नंबरचे शिल्लक भूखंडाचे क्रमांक याबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. सन २००६ पासून आपण ही मागणी करीत असून अपुरी माहिती दिली जात आहे. कार्यालयात वारंवार आपण गेलो असता जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांची भेट होत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुनिल मधुकर जगताप यांनी केली.

अपीलकर्त्याने सन १९९२ ते सप्टेंबर २००६ असा माहितीचा कालावधी नमूद केला असला तरी संबंधित माहिती सन १९७० मधील आहे. उपलब्ध माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एन. व्ही. शेळकंदे यांनी विहित मुदतीत दिली. सर्व जुने प्रकल्प असून अभिलेख अद्ययावत नाहीत. जे अभिलेख आहेत, ते जीर्ण अवस्थेत आहेत. अभिलेखाचे संकलन करावे लागेल, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, पुणे डॉ. दीपा बापूसाहेब भोसले यांनी केले.

माहिती जुनी व विस्तृत असून अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे संकलित करण्याचा प्रयत्न करीत आहोत, मात्र त्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागेल, असे निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे श्री. प्रशांत शेळके यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एन. व्ही. शेळकंदे यांनी दिलेल्या उत्तरात दोन गावांचे सर्व्हेक्षणाचे कामचालू असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. तसेच 'धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी किती ठिकाणच्या जमिनी संपादन केल्या त्या राजपत्राच्या प्रती अभिलेख कक्षात शोधण्याचे काम चालू आहे. त्या उपलब्ध झाल्यास नंतर कळविण्यात येईल व पुनर्वसनासाठी सध्या शिल्लक असलेल्या जमिनीबाबत तहसीलदार, दौंड यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे,' असे कळविले आहे. या

उत्तराला तीन वर्षांचा कालावधी झाल्यानंतरही अभिलेखाचा शोध घेण्याचे काम चालू असल्याचे सांगितले जाते, ही बाब अत्यंत आक्षेपार्ह व शासन यंत्रणेतील दिरंगाई व बेपवाई यांची निदर्शक आहे. पुनर्वसनासारख्या महत्त्वाच्या विषयातील अभिलेखाचे संकलन झालेले नसणे व अभिलेख अद्यावत नसणे ही बाब आक्षेपार्ह आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी याची गंभीर दखल घेऊन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितलेल्या माहितीबाबतचे अभिलेख संकलित करण्यासाठी सहा महिन्यांचा अवधी अमान्य करण्यात येत असून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी दोन महिन्यात अभिलेख संकलन पूर्ण करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी यांना दिले. त्यानुसार कार्यवाही करण्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्री. प्रशांत शेळके यांनी केले असून त्याबाबतचा अहवाल दि. १०.५.२०१० पर्यंत त्यांनी आयोगाला सादर करावा.

३. जमिनीच्या नोंदीविषयक कायम स्वरूपाच्या जतनाचे अनेक अभिलेख आढळ होत नसल्याचे उत्तर विविध अर्जांवर दिले जात असल्याचे आयोगाचे निदर्शनास सातत्याने येत आहे. जिल्हाधिकारी पुणे यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करून विशिष्ट मुदतीत असे अभिलेख संकलित करण्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे.

४. जमीनविषयक माहितीचा मूळ स्त्रोत असलेले अभिलेख उपलब्ध न होणे म्हणजे नागरिकांना माहिती नाकारणे आहे. हे लक्षात घेऊन जिल्हाधिकारी, पुणे यांनी अभिलेख संकलनाबाबतची योजना, तिची मुदतीत पूर्तता करावयाच्या तपशिलासह अहवाल आयोगाला दि. १०.५.२०१० पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३.४.२०१०**

प्रत : जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वासुदेव शर्मा
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ऑल इंडिया अँटी करप्शन कमिटी,
काळेवाडी फाटा, पिंपरी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६६८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वासुदेव शर्मा
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ऑल इंडिया अँटी करप्शन कमिटी,
काळेवाडी फाटा, पिंपरी, पुणे प्रतिनिधी श्री.सुनिल के.अग्रवाल

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.एन.व्ही.पुरोहित

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.८.२००७ व १.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.८.२००७ व २९.८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.१०.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

नागरी सहकारी बँक / पतसंस्था यांच्या वसुलीसाठी सहकार खात्याचे संबंधित कर्मचारी नियमानुसार मान्य असलेल्यापेक्षा जास्त शुल्क लावतात. वसुलीसाठी त्रास दिला जातो. कोऱ्या वचनचिठ्ठ्यांवर सह्या घेतल्या जातात व नंतर त्यात फेरफार केले जातात, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वासुदेव शर्मा यांचे प्रतिनिधी श्री.सुनिल के.अग्रवाल यांनी केली.

नागरी सहकारी बँक / पतसंस्था यांच्याकडील वसुलीच्या अनुषंगाने विशेष वसुली अधिकारी करीत असलेल्या / केलेल्या कार्यवाहीविषयी श्री.शर्मा सातत्याने अर्ज तक्रारी करीत असतात. कार्यवाहीबाबत त्यांचे आक्षेप असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम १५ सह १५४ अन्वये ते दाद मागू शकतात. एकाच माहितीसाठी त्यांनी नऊ ते दहा अर्ज केले असून त्याचे उत्तर दिलेले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एन.व्ही.पुरोहित यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.शर्मा यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असून वसुली प्रक्रियेबाबतचे आक्षेप व अभिप्राय त्यांनी नोदविलेले आहेत. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे डॉ.किशोर तोष्णीवाल यांच्या संदर्भात मालमत्तेपासून त्यांच्या नातेवाईकापर्यंत विविध स्वरूपाच्या माहितीची

मागणी त्यांनी केली आहे. श्री.तोष्णीवाल यांच्या विद्यमान सेवेतील कार्यकाल, शैक्षणिक अर्हता याची माहिती देणे आवश्यक आहे. तथापि त्यांच्यापुढे दाखल झालेले पुनर्विलोकन अर्ज, त्यावरील निर्णय इत्यादी माहिती ढोबळ स्वरूपातील व विस्तृत असल्यामुळे अपीलकर्त्यास आवश्यक वाटल्यास अभिलेखाचे अवलोकन करून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शांतीलाल जुगराज कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे                                  अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रमुख विधी सल्लागार,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे                                  उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा म्युनिसिपल प्रॉसिक्युटर,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शांतीलाल जुगराज कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रमुख विधी सल्लागार,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.श्रीमती मंजुषा सतीश इधाटे

**जन माहिती अधिकारी** तथा म्युनिसिपल प्रॉसिक्युटर,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.श्रीमती मंजुषा सतिश इधाटे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माहिती मागण्याच्या आपल्या मूळ अर्जाला जन माहिती अधिकारी तथा म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी उत्तर दिले नाही. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती परिपूर्ण असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला. सुनावणी १६ तारखेला झालेली असताना १३ तारखेला झाल्याचे नोंदविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शांतीलाल जुगराज कावेडिया यांनी केली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अशा दोन्हीचा पदभार आपल्याकडे आहे व आपण विहित मुदतीत उत्तर दिले. त्यांची मागणी भाष्यवजा अन्वयार्थाची अपेक्षा करणारी असूनही स्पष्टीकरणात्मक उत्तरे दिली. अपिलाची सुनावणी १६ तारखेला झाली, हे श्री.कावेडिया यांचे म्हणणे योग्य आहे. १३ तारीख हा टंकलेखनातील दोष आहे, असे जन माहिती अधिकारी तथा म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती मंजुषा सतिश इधाटे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील एका आठवड्यात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार ॲड.श्रीमती इधाटे यांनी दि.२३.४.२०१० च्या पत्रान्वये तपशीलवार खुलासा सादर केला. श्री.कावेडिया यांनी दि.८.७.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि.५.८.२००९ च्या पत्रान्वये दिली होती. तीच माहिती दि.२९.८.२००९ च्या अर्जान्वये पुन्हा मागितली. या काळात सहा.जन माहिती अधिकारी यांची अचानक बदली, आपल्याकडे तीन पदांचा एकत्रित पदभार,

न्यायालयीन कामकाज आदीमुळे पुन्हा तीच माहिती देण्यास विलंब झाला. माहिती मिळाली असून तक्रार नसल्याच्या पत्रावर त्यांनी स्वाक्षरीही केली आहे, असे ॲड.श्रीमती विधाते यांनी विस्ताराने नमूद केले. हा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पुरूषोत्तम विनायक गोखले
६, विश्वशोभा सह गृहनिर्माण संस्था,
मोदी गणपतीचे मागे, ५२८, नारायण पेठ, पुणे-४११ ०३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २४.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. पुरूषोत्तम विनायक गोखले
६, विश्वशोभा सह गृहनिर्माण संस्था,
मोदी गणपतीचे मागे, ५२८, नारायण पेठ, पुणे-४११ ०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे-७ तर्फे प्रतिनिधी श्री. बी. डी. उढाणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे विद्यापीठांतर्गत पुणे शहरातील विधी महाविद्यालयांमधील एका वर्षातील विद्यार्थ्यांची नावे, पत्ते आदी माहिती आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ यांनी कळविलेले शुल्क भरले. परंतु विद्यार्थ्यांची फक्त नावे कळविली. नावे व पत्ते यांची एकत्रित स्वरुपाची नोंद केली जात नसल्याचे जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी सुनावणीला आपल्याला न बोलाविता एकतर्फी निर्णय दिला. छायांकित प्रती निःशुल्क देण्यात येत असल्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' च्या वेळी आपल्याला सांगितले. परंतु आधी कल्पना दिली नव्हती, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पुरूषोत्तम विनायक गोखले यांनी केली.

श्री. गोखले यांनी दि.१८.८.२००७ रोजी अर्ज केला. परीक्षा विभागाकडून माहिती घेऊन दि. १४.९.२००७ रोजी त्यांना दिली. परीक्षा अर्जावर विद्यार्थ्याच्या पत्यासाठी एक रकाना असतो. परंतु अशा पत्यांची वेगळी नोंद करुन यादी केली जात नाही. त्यांनी मागणी केल्यानुसार विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ४००० होते, त्या सर्वांची माहिती संकलित करुन देणे शक्य नाही, असे त्यांना कळविले. आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने विद्यापीठात येऊन संबंधित परीक्षाअर्जांचे अवलोकन करावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घ्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,पुणे विद्यापीठ यांनी दिला. परंतु ते आले नाहीत व आपण येणार नाही, तुम्हीच माहिती तयार करुन द्या, असे त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी सांगितले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, श्रीमती अरूणा वि. चव्हाण यांनी केले.

अभिलेखात उपलब्ध असल्याप्रमाणे माहिती दिली. परीक्षा अर्ज नियमानुसार एक वर्षापर्यंतच जतन केले जातात, असे अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, यांचे प्रतिनिधी श्री. बी. डी. उढाणे यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांची नावे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली असली तरी त्यांचे निवासी पत्ते व अन्य तपशील देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्ष म्हणून संबंधित विद्यार्थ्यांच्या संमतीशिवाय योग्य नाही. व्यापक स्वरुपातील संपूर्ण माहिती संकलित करुन देण्याची

अपेक्षा अपीलकर्त्यास करता येणार नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. छायांकित प्रती नि:शुल्क देण्याचे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले असल्यास आकारलेली शुल्काची रक्कम परत करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर नामदेव लोखंडे
घर क्र.१०९२, चावडी चौक, आळंदी देवाची, — अपीलकर्ता
ता. खेड, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती खेड राजगुरुनगर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मरकळ, ता. राजगुरुनगर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०७ + १९५९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२०१० व ११.३.२०१० |

६ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मधुकर नामदेव लोखंडे
घर क्र.१०९२, चावडी चौक, आळंदी देवाची,
ता. खेड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती खेड राजगुरुनगर, जि. पुणे श्री. के. बी.नेहरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मरकळ, ता. राजगुरुनगर, जि. पुणे श्री. आनंदा बापू पोळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावातील गटारे, रस्ते, अंगणवाडी, आपल्या घरासंबंधीच्या नोंदी आदीबाबत आपण मागितलेली माहिती दोन वर्षे उलटून गेल्यानंतर दिली. वारंवार हेलपाटे घालून व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी दखल घेतली नाही. परिणामी आपल्याला आर्थिक व मानसिक त्रास झाला. जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, व आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मधुकर नामदेव लोखंडे यांनी केली.

श्री. लोखंडे यांनी दोन अर्जांन्वये एकच माहिती मागितली होती. सन १९६२ ते २००८ या कालावधीतील ही माहिती असून १९६२ ते १९९३ या काळातील दप्तर आढळून येत नव्हते. ग्रामपंचायत कार्यालयाचे जुन्या इमारतीतून नव्या इमारतीत स्थलांतर झाले. आपण दप्तर शोधत असून ते मिळताच्च माहिती देऊ, असे श्री. लोखंडे यांना सांगितले होते. दप्तर प्राप्त झाल्यानंतर सन १९७८ सालच्या कागदपत्रांमध्ये या नोंदी मिळाल्या व त्यानंतर दि. १७.२.२०१० रोजी श्री. लोखंडे यांना माहिती दिली. त्यांनी मागितलेल्या माहितीसाठी दप्तरातील प्रत्येक पान चाळावे/वाचावे लागले. त्याशिवाय माहिती देता आली नसती. ही बाब लक्षात घेऊन व यापुढे विहित मुदतीत माहिती देण्याची दक्षता आपण घेणार असल्यामुळे दंडात्मक कारवाई करु नये, अशी लेखी व तोंडी विनंती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक मरकळ, ता. राजगुरुनगर श्री. आनंदा बापू पोळ यांनी केली. अपील क्र. १७०७ च्या आयोगापुढील सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर आपण माहिती दिली, हे त्यांनी मान्य केले.

श्री. पोळ सांगतात ती वस्तुस्थिती नाही. कागदपत्रांबाबतची नेमकी मागणी आपण केली होती. जुन्या व नव्या इमारतीत अभिलेख आहेत, असे गृहित धरले तरी त्यासाठी दोन वर्षांहून अधिक काळ लागण्याची गरजच नव्हती. रस्त्याचे अपुरे काम, नोंदीतील चुका या बाबी लपविण्यासाठीच माहिती देण्याची टाळाटाळ श्री. पोळ यांनी केली आपल्या सारख्या माजी सैनिकाला चांगली वागणूक दिली नाही, असे प्रतिपादन श्री. लोखंडे यांनी केले.

श्री. पोळ यांना अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत वेळोवेळी समज दिली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते व श्री. पोळ

यांनी निवेदनात ते मान्य केले.

वरील सर्व बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मरकळ श्री. आनंदा बापू पोळ यांनी हलगर्जीपणा केला आहे, हे स्पष्ट होते. जुनी कागदपत्रे शोधण्यास काही कालावधी लागेल, असे गृहित धरले तरी दि. १५.१२.२००७ च्या अर्जावर दि. १७.२.२०१० म्हणजे दोन वर्षे दोन महिने एवढा कालावधी झाल्यावर माहिती दिली आहे. हा विलंब क्षम्य ठरत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. पोळ शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. मधुकर नामदेव लोखंडे यांची नुकसान भरपाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मरकळ श्री. आनंदा बापू पोळ यांनी माहिती विहित मुदतीत दिली नसल्याने त्यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या मे, जून, जुलै व ऑगस्ट २०१० या महिन्यांच्या जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून चार समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, राजगुरुनगर-खेड, ता. राजगुरुनगर यांनी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सीताराम चिमाजी थोरात
अे-३-८, रेणूका हौ.सो.चिंतामणी नगर,
पुणे-१,बिबवेवाडी,पुणे-४११ ०३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे श्री.देवराम हरीभाऊ पिंगळे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे श्री.प्रशांत सु.पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.०२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

फेरफार नोंद रद्द करण्याबाबत आपण केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मिळावी व चुकीची नोंद करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सीताराम चिमाजी थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडील अर्जात व निवेदनाद्वारे केली आहे.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापी मूळ प्रश्न समजावून घेऊन सन १९८७ मधील नोंद फेरचौकशीत घेण्यात आली व ही नोंद रद्द करण्याचा निर्णय दि.३०.०१.२००९ रोजी दिला. त्यामुळे अपीलकर्त्याच्या मूळ तक्रारीचेही निराकरण झाले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे श्री.देवराम हरीभाऊ पिंगळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. तत्कलीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे श्री.दिगंबर पोपट रौंधळ व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय आंबेगाव,जि.पुणे श्री.दत्तात्रय ब. कवितके यांनी माहिती मागणीच्या अर्जापलीकडे जाऊन मूळ प्रश्न सोडविण्यासाठी केलेली कार्यवाही प्रशंसनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हिराचंद धर्माजी घोळवे
मु.पो.निंबोडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे श्री.एस.पी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे श्री.एस.एन.बोलभट

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

अपीलकर्ता श्री.हिराजी धर्माजी घोळवे यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.४ हा चौकशी संदर्भातील होता. त्यावेळी चौकशी चालू असल्यामुळे तसे कळविले. चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अहवालाची मागणी केली. त्यानुसार ती प्रत विहित मुदतीत देण्याात आली, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे श्री.एस.एन.बोलभट यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नामदेव अभिमन्यु सरवदे
प्रतिभाताई परिचारिका नगर,
प्लॉट नं.२०/१ टाकळी रोड, पंढरपूर
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती पंढरपूर,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,**
(शिक्षण विभाग) पंचायत समिती,
पंढरपूर जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४७/२००९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/०७/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०८/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४/०९/२००९ |
| ५ | **उपस्थिती**<br>गट शिक्षणाधिकारी, (शिक्षण विभाग) पंचायत समिती,<br>पंढरपूर जि.सोलापूर<br>श्री.एच.टी.कोष्टी<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर,<br>जि.सोलापूर<br>श्री.चंद्रशेखर जगताप | |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पंढरपूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या पगारातून कपात होणा-या रक्कमेच्या तपशिलाबाबत एकूण १४ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नामदेव अभिमन्यु सरवदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.८/४/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला माझ्या मागणीप्रमाणे एकूण १४ मुद्दयांची माहिती मिळाली असून माझी कोणतीही तक्रार नाही,' असे अपीलकर्त्याचे दि.१८/३/२०१० चे लेखी निवेदन आयोगास सुनावणीच्या वेळी सादर करण्यात आले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 8 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामकृष्ण हेरंब बोकील
फ्लॅट नं.९,४९८,अ-नारायण पेठ, रामदूत को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१),
५८२-डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहकारी अधिकारी (श्रेणी-१)
पुणे शहर (१) यांचे कार्यालय,
५८२-डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, पुणे शहर (१),<br>५८२-डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७ | श्री.विनायक विठ्ठल कोकरे |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०९.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.०१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९८-९९ पासून आजपर्यंत रामदूत सोसायटीच्या न घेतल्या गेलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभांबाबतची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.०२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.रामकृष्ण हेरंब बोकील यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१) यांचे कार्यालय, मार्केटयार्ड, पुणे यांचेकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (श्रेणी-१), पुणे शहर (१) यांनी माहिती अर्धवट व अपुरी पुरविली, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चा अनादर केला व प्रकरण निकाली काढले, असे नमूद करुन अपीलकर्ता श्री.बोकील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), अपील दाखल केले होते. सदर अपिलावरील सुनावणीमध्ये 'अपीलकर्त्याच्या आईने माहिती अधिकार अर्ज व अपील केलेले नसल्याने व श्री.बोकील हे संस्थेचे सभासद नसल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात येत आहे', असे आदेशित करुन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१),यांनी दि.३१.०१.२००८ च्या आदेशान्वये अपील नामंजूर केले आहे. तद्नंतर दि.१८.०३.२००९ च्या पत्रान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१) यांनी श्रीमती बोकील या रामदूत सहकारी गृहरचना संस्थेच्या सभासद असल्याने त्यांनी माहिती -मागणी अर्जान्वये अथवा तोंडी स्वरुपात गृहनिर्माण संस्थेकडील ज्या कागदपत्रांची मागणी केली असेल अथवा त्यांना सदर कागदपत्रे अवलोकन करावयाची असल्यास त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ३२ मधील तरतुदीन्वये उपलब्ध करुन द्यावीत', अशा सूचना दिलेल्या आहेत. अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन कार्यवाही करुन त्याची समज अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने दिली होती. तसेच माहिती मिळण्याबाबत कार्यवाही केलेली आहे, हे उपस्थित अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, यांचे आयोगासमोरील सुनावणीमधील प्रतिवेदन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 30 APR 2010